# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## धर्मग्राम पाळकीय मंडळ शपथविधी

## सामान्य काळातील १९ वा रविवार – ११ ऑगस्ट २०२४

**प्रवेश मिरवणूक ः** वेदी सेवक, पाळकीय सदस्य, वाचक, सह-पुरोहित व मुख्य पुरोहित चर्चच्या मुख्य दरवाज्यातून भव्य मिरवणुकीने चर्चमध्ये प्रवेश करतील.

**प्रस्तावना ः**

आम्ही शिष्य प्रभुचे,<br>
एक शरिरी, एकच आत्मा,<br>
त्याच्या प्रतिछायेचे.

होय प्रभो, आम्ही तुझ्या प्रतिछायेचे पाईक आहोत. तू म्हणतोस, “जो कोणी स्वतःचा वधस्तंभ घेऊन माझ्या मागे येत नाही, त्याला माझा शिष्य होता येत नाही.” म्हणूनच पित्याने आम्हाला दिलेल्या देणगीप्रमाणे आम्ही आमचा वधस्तंभ घेऊन तुझ्या ख्रिस्तसभेच्या सेवाकार्यासाठी सज्ज झालो आहोत. तू प्रभू आणि गुरू असूनही तुझ्या शिष्यांचे पाय धुतलेस. आम्ही देखील परस्परांचे पाय धुवावेत, सेवा करावी म्हणून तू आम्हाला तुझ्या पवित्र आत्म्याने आणि ज्ञानाने परिपूर्ण कर. तुझ्या कळपाचे रक्षण व संवर्धन आमच्या हातून घडावे म्हणून तू आम्हाला आशीर्वादित कर.

आपल्या धर्मग्रामातील सर्व पाळकीय सदस्यांसाठी या मिस्साबलिदानात आपण प्रार्थना करू या. प्रभूचे कार्य करण्यासाठी त्यांना विशेष पाठबळ मिळत राहो.

आता आपण सर्वजण उभे राहून प्रवेश गीतात सहभागी होऊ या.

**प्रवचनानंतर ः**

**धर्मग्राम पाळकीय मंडळाच्या सदस्यांवर आशीर्वाद व त्यांचा समर्पण विधी**

*प्रमुख धर्मगुरू धर्मग्राम पाळकीय मंडळाच्या सदस्यांची नावे घेऊन त्यांना वेदीजवळ बोलावतील. सर्व सदस्य वेदीसमोर अर्थवर्तुळाकार उभे राहतील.*

श्री.    सौ. .....

धर्मगुरू ः ख्रिस्ताठायी माझ्या बंधू भगिनींनो, देव पित्याने आपल्या तारणाची योजना त्याच्या पुत्राच्याद्वारे आपल्याला जाहीर केली आहे. त्याचा पूत्र येशू ह्यांने मानवी रूप धारण करूण पित्याची तारण योजना पूर्णत्वास नेली आहे. त्यांने आपल्याला सर्व आध्यात्मिक ज्ञान देऊन त्याची ख्रिस्तसभा आपले मिशन कार्य म्हणून आपल्याकडे सोपविली आहे.

प्रभूच्या मिशन कार्यात सहभागी होऊन ख्रिस्तसभेत महत्वाची भूमिका बजावण्यासाठी गावपरिवारांतून आपली निवड करण्यात आली आहे. प्रेषितीय जबाबदारीचा व कार्याचा अभ्यास करण्यासाठी, धर्म ग्रामाच्या विकासासाठी, धर्मगुरूंना सहाय्य करण्यासाठी, श्रद्धावंताच्या गरजा शोधून त्या निर्धारीत करण्यासाठी, परिसरात स्नेहभाव, प्रेम व सामंजस्य निर्माण करण्यासाठी, विधायक संघटनेच्या उपक्रमात परस्पर सहकार्य साधण्यासाठी  तुम्हाला पाचारण करण्यात आले आहे. तुमच्या भरीव योगदानाने सर्व जनतेला पित्याची ओळख होईल तसेच त्यांने ज्याला पाठविले त्या ख्रिस्ताची ओळख होईल व त्याद्वारे सर्वांची शाश्वत जीवनाकडे यशस्वी वाटचाल सूरू होईल.

धर्मगुरू ः तुमच्यावर सोपविलेली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी तसेच आपल्या धर्मग्रामाला व धर्म प्रांताला आदर्श  बनविण्यासाठी तुम्ही तयार आहात का?

उत्तर ः होय.

धर्मगुरू ः ख्रिस्तसभेमधील तुमची भूमिका अंत्यत सावधगीरीने पार पाडण्यास आणि ख्रिस्त प्रभू व त्याच्या शिकवणुकीशी निष्ठेने राहण्यास तुम्ही तयार आहात का?

उत्तर ः होय.

## आपण धर्मग्राम पाळकीय सदस्यांसाठी प्रार्थना करू याः

बंधू आणि भगिनींनो, ख्रिस्तसभेची सेवा करण्यासाठी निवडलेल्या ह्या पाळकीय सदस्यांना प्रभूने आशीर्वादित करावे म्हणून आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या. त्यांनी आपले काम निष्ठेने करावे, ख्रिस्ताला जगाला जाहीर करावे आणि त्याद्वारे देव पित्याचा गौरव करावा म्हणून सुद्धा आपण त्यांच्यासाठी प्रार्थना करू या.

## प्रार्थना

*धर्मगुरू धर्मग्राम प्राळकीय सदस्यांवर आपले हात ठेवून म्हणतातः*

हे प्रभो, सर्व चांगुलपणाच्या व प्रकाशाच्या उगमा, तू आपल्या एकुलत्या पुत्राला तुझ्या प्रेमाचे रहस्य खुले करण्यास आमच्याकडे पाठविले. तुझ्या ख्रिस्तसभेच्या सेवेसाठी निवडलेल्या ह्या तुझ्या सेवकांना आपले काम निष्ठेने करण्यास सामर्थ्य दे, सक्षम कर. तुझ्या शब्दावर मनन चिंतन करून ते ज्ञानाने परिपूर्ण व्हावेत व तुझे आदर्श प्रचारक बनावेत. त्यांना नेहमी त्यांच्या जबाबदारीची व कार्याची जाणीव करून दे व त्याप्रमाणे कार्य करण्यासाठी मार्गदर्शन कर. प्रेमळ पिता त्यांना आपले जीवन प्रभूच्या मार्गाने नेण्यास कृपा देवो, ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशूच्या नावाने करतो. आमेन.

## पाळकीय सदस्यांचा समर्पण विधी

*धर्मग्राम पाळकीय सदस्य आपले हात जोडून धर्मगुरूंच्या मागे पुढील प्रतिज्ञा करतील. आपण त्यांच्यासाठी मूक प्रार्थना करू या.*

“ख्रिस्तसभेच्या पवित्रीकरणाची व प्रेषितीय कार्याची जी पाळकीय जबाबदारी या धर्मग्रामावर आहे त्या कार्यात सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी माझ्या गावपरिवाराने माझी जी निवड केली आहे तिचा मी स्वीकार करतो/ ते. ही जबाबदारी मोठी आहे आणि मी दुर्बळ आहे याची मला जाणीव आहे. माझ्या गावपरिवारातील श्रद्धावंतानी माझ्यावर टाकलेला विश्वास, त्यांच्या प्राथनेचे पाठबळ व प्रभू परमेश्वराच्या कृपेचे वरदान यांवर माझी नितांत श्रद्धा आहे. म्हणून मी (नाव ______________________________ ) प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/ते की ः

१. धर्मग्राम पाळकीय मंडळ हे एक ‘कुटुंब’ आहे ही भावना मनात जोपासून ख्रिस्तसभेशी मी एकनिष्ठेने वागेन.

२. मंडळाच्या सर्व सभांना हजर राहीन.

३. माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून सभेतील चर्चेमध्ये मी भाग घेईन.

४. चर्चिलेल्या मुद्यांवर निकोप दृष्टिकोनातून विचारविनिमय व मनन चिंतन करीन.

५. व्यक्तीशः माझ्यावर व मंडळावर आलेल्या सामुहिक जबाबदारीचा आणि कर्तव्यांचा मी आनंदाने स्वीकार करीन.

६ . सभांमध्ये चर्चिलेल्या आवश्यक बाबींची मी गोपनीयता ठेवीन .

७ . तीन वर्षांकरिता सेवा करण्याची संधी प्रभू परमेश्वराने मला दिली आहे तिचा विधायकरीत्या उपयोग करण्याचा मी प्रयत्न करीन . या कामी प्रभू मला सहाय्य करो . आमेन .

*धर्मगुरू धर्मग्राम पाळकीय मंडळाच्या सदस्यांवर पवित्र पाणी शिंपडून म्हणतात ः*

तुमच्या कपाळावर करीत असलेल्या या खुणेद्वारे प्रभूच्या कुसाचा स्वीकार करा . ख्रिस्त येशू स्वतः तुम्हाला ह्या कुसाद्वारे त्याच्या प्रेमाने सक्षम करो .

सर्व ः आमेन्

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, आज आमचे धर्मग्राम पाळकीय मंडळाचे सदस्य तुझे कार्य पुढे नेण्यासाठी स्वतःला समर्पित करीत आहे. आम्ही तुझ्याकडे अशी प्रार्थना करतो की त्यांनी मनापासून व बिनशर्त तुझा पुत्र व आमचा प्रभू येशू ख्रिस्त याचे अनुकरण करावे.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. ख्रिस्तसभेची सेवा करणारे आपले पोप फान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूने त्याचे जगातील प्रभावी व उत्तम सुवार्तिक बनण्यासाठी मार्गदर्शन करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. केरळमधील वायनाड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या भूस्खलन घसरणीत मरण पावलेल्यांच्या आत्म्याना शांती मिळावी, जखमी लोकांना वैद्यकीय मदत मिळावी, तेथील जनतेला शासन व इतर सेवाभावी संघटनेकडून आवश्यक ते साहाय्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. स्वतःला ख्रिस्तसभेच्या कार्यासाठी समर्पित करण्या-या ह्या पाळकीय सदस्यांना प्रभूने आशीर्वादित करावे, त्यांनी आमच्या धर्मग्रामाच्या व भाविकांच्या गरजा शोधून प्रभूच्या प्रकाशात त्या निर्धारित करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. या पवित्र मिस्सा बलिदानात सहभागी झालेल्या आपण सर्वांनी प्रभूच्या वचनाने परिपूर्ण होऊन व त्याच्या अति पवित्र शरीर व रक्ताचे सेवन करून ख्रिस्तसभेचे आदर्श व क्रियाशील सभासद बनावे म्हणून प्रार्थना करू या.

५. तुरूंगात डांबलेल्या आमच्या बांधवावर प्रभूने दया करावी, तुरूंगवासियांची सेवा करण्यासाठी हातभार लावणा-या निःस्वार्थी स्वयंसेवकांना व त्यांच्या कुटुंबियांना परमेश्वराचा आशीर्वाद लाभावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

६. आपल्या गावपरिवारातील सर्वांना चांगले आरोग्य लाभावे, लहान बालकांवर चांगले संस्कार केले जावेत, वयोवृद्धांची योग्य ती काळजी घेतली जावी, स्त्रियांना सन्मानाने वागविले जावे तसेच आपल्या नोकरी व्यवसायावर प्रभूचा वरदहस्त असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व सामुदायिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. तुझ्या राज्यासाठी आमचे योगदान देण्यास पवित्र आत्म्याच्याद्वारे आम्हाला सक्षम कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.